Express/Ordinary
Civil/Criminal/M.A.C.T.
C.A.No. 1397 /2012

Copy of : Judgment

1) The date on which the copy was applied for on 4/10/2012 — Fourth day of Oct. 2012

2) The dated on which the appln. was completed on 10/10/2012 — Tenth day of Oct 2012

3) The date (which the date once given is subsequently changed, the list of such changed dates) given to the applicant for takling delivery of the Copy on 16/10/2012 — Sixteenth day of Oct 2012

2012	2012
2012	2012
2012	2012
2012	2012
2012	2012

4) The date on which the copy was ready for delivery on 12/10/2012 — Twelth day of Oct. 2012

5) The date on which it was delivered/posted on 16/10/2012 — Sixteenth dy of oct 2012

Assistant Superintendent,
Record & Copying Section,
District & Session Court, Wardha

In the Court of : 2nd Jt. Civil Judge, S.D. Dn. Kiardha.

In Case of : Spl. C.S. No. 72/02

In case of Parties : Kl.D.C.C. Bank Vs. Home Trade +1

Decided/P.F. On : 5/05/12

दावा दाखल तारीख : २६.८.२००२
दावा नोंदणी तारीख : ०२.०९.२००२
दावा निकाल तारीख : ०५.०५.२०१२
कालावधी: -- **वर्ष महीने दिवस**
०९ ०८ ०९

कोर्ट विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,वर्धा.

विशेष दिवाणी दावा क्र. ७२/२००२

नि.क्र. 925
अ

वर्धा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक,
मर्यादीत वर्धा. मार्फत मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री अरूण गंगाधरराव मुद्देश्वर,
वय अंदाजे ५१ वर्ष, व्यवसाय-नोकरी,
राहणार वर्धा, तहसिल व जिल्हा वर्धा. .... **वादी**

.. **विरूध्द** ..

१. होम ट्रेड लिमिटेड, टावर ४, ५ वा मजला,
वासी रेल्वे स्टेशन कॉम्प्लेक्स, नवी मुंबई
२. श्री संजय अग्रवाल,
डायरेक्टर ऑफ होम ट्रेड लिमिटेड, नवी मुंबई,
कुसूम अपार्टमेंट्स, बंगला क्र.७०२,
सेक्टर १७, वासी, नवी मुंबई
३. श्री एन.एस.श्रीवेदी,
डायरेक्टर ऑफ होम ट्रेड लिमिटेड,
पुष्पम बंगला क्र.३अे, ६ खांदुभाई रोड,
विले पार्ले (पश्चिम), मुंबई
४. श्री केतन सेठ,
डायरेक्टर ऑफ होम ट्रेड लिमिटेड,
टावर ४, ५वा मजला,
वासी रेल्वे स्टेशन कॉम्प्लेक्स, नवी मुंबई
५. श्री सुबोध भंडारी,
डायरेक्टर ऑफ होम ट्रेड लिमिटेड,
टावर ४था, ५वा मजला,
वासी रेल्वे स्टेशन कॉम्प्लेक्स, नवी मुंबई
६. श्री मनोज शाह
डायरेक्टर ऑफ होम ट्रेड लिमिटेड,

टावर ३, बेलोरी रोड,
आरएमव्ही एक्सटेंशन, बंगलोर (वगळले)

७. श्री धनजय अग्रवाल,
डायरेक्टर ऑफ होम ट्रेड लिमिटेड,
१४३-अे, मित्तल कोर्ट, नरीमन पॉईन्ट,
मुंबई.

८. श्री ॲलन जेम्स,
मॅक मिलन, डायरेक्टर ऑफ होम ट्रेड लिमिटेड,
७८५ गॅस प्रे स्टीट , माउंटन ह्यू सीए,
यु.एस.ए. ९४०४१ .... (वगळले)

९. श्री रसेल बोकने क्रोजर,
डायरेक्टर ऑफ होम ट्रेड लिमिटेड,
टावर ४था, ५वा मजला, ... (वगळले)
वासी रेल्वे स्टेशन कॉम्प्लेक्स, नवी मुंबई

१०. श्री शशांक जी. रानडे,
डायरेक्टर ऑफ होम ट्रेड लिमिटेड,
३/१ राधा क्रिष्णा निवास,ग्राउंड फलोअर,
डागाडीवाडी, एस.के.बोले रोड,
दादर (पश्चिम), मुंबई

११. श्री सलील डी.गांधी,
डायरेक्टर ऑफ होम ट्रेड लिमिटेड,
अे-११/१३ गोल्ड कॉइन सीएच-सोसायटी,
तारदेव मुंबई. ... (वगळले)

१२. श्री विजयकुमार एच. मोदी, ... (वगळले)
डायरेक्टर ऑफ होम ट्रेड लिमिटेड,
अे/२०३ बोरीवली, अमिता सीएच-सोसायटी,
कुलूवाडी रोड, बोरीवली (पुर्व),मुंबई. ... प्रतिवादी

दावा किंमत रूपये ३०,२१,९४,५१३.८९

.....

वादीतर्फे वकील श्री पी.बी.टावरी
प्रतिवादी क्र. १ ते ५,७ ते ९ व १० एकतर्फा
प्रतिवादी क्र. ६,११ व १२ तर्फे वकील श्री एम.पी.ध्रुव
(प्रतिवादी क्र. ६, ८, ९, ११ व १२ यांना नंतर वगळण्यात आले आहेत.)

.....

न्यायनिर्णय

(निकाल पारित तारीख ५ मे २०१२)

.....

१. वादी यांचे थोडक्यात असे कथन आहे की, वादी बॅंक ही महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटीव्ह कायदयाअतर्गत नोंदणीकृत सहकारी संस्था आहे व ती रिझर्व्ह बॅंकेच्या नियंत्रणात व नियमानुसार कार्य करते. प्रतिवादी क्र. १ "होम ट्रेड लि." ही, कंपनी कायदयानुसार प्रस्तापित झालेली कंपनी आहे. प्रतिवादी क्र. २ यांनी दिलेल्या माहीतीप्रमाणे ते व प्रतिवादी क्र. ३ ते १२ हे प्रतिवादी क्र. १ कंपनीचे संचालक आहेत. वादी यांच्या मते सदरील सर्व संचालक हे प्रतिवादी क्र. १ कंपनीच्या कृत्यांना जबाबदार आहेत.

२. वादी बॅंकेला GOI-2015-10.47 या प्रकारच्या सरकारी प्रतिभूती विकत घ्यावयाच्या होत्या. त्यासाठी तारीख २४.२.२००१ रोजी वादी बॅंकेच्या कार्यकारी सदस्यांच्या सभेमध्ये ठराव क्र ६(९) अन्वये ठराव पारित करण्यात आला व त्याप्रमाणे वादी बॅंकेस २५ करोड रूपये वर नमूद प्रतिभूती खरेदीसाठी गूंतविण्याचे ठरले.

३. प्रतिवादी क्र. १ कंपनी ही प्रतिभूती दलाल म्हणून काम करते व ती मुंबई स्टॉक एक्सचेंज, नॅशनल स्टॉक एक्सचेंज तसेच "सेबीची" सदस्य आहे, असे प्रतिवादी क्र. २ ते ४ यांनी वादी बॅंकेस सांगून वादी बॅंकेला खरेदी करावयाच्या वर नमूद प्रतिभूती नियमानुसार विकत घेवून देतील असे भासविले. तारीख १६.३.२००१ रोजीच्या पत्रासोबत "सेबी", नॅशनल स्टॉक एक्सचेज तसेच मुंबई स्टॉक एक्सचेंज यांची सदस्य प्रमाणपत्रे, प्रतिवादी क्र.१ कंपनीच्या वतीने वादींना पाठविली होती.

४. वादी बॅंकेला घ्यावयाच्या वर नमूद प्रतिभूती, प्रतिवादी क्र. १ कंपनी मार्फत खरेदी करण्याचे ठरले. महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटीव्ह बॅंक लिमिटेड मुंबई येथे प्रतिवादी क्र. १ कंपनीचे १७०३१ क्रमांकाचे खाते असल्याचे प्रतिवादी क्र. १ च्या वतीने वादी बॅंकेस तारीख ८.३.२००१ रोजी कळविण्यात आले.

वादी यांचेही त्याच बॅकेत ५४/२३५ या क्रमांकाचे बॅक खाते होते. तारीख १६.३.२००१ रोजी प्रतिवादी क्र. १ कंपनीच्या वर नमुद बॅक खाते क्र. १७०३१ मध्ये २५,२४,७२,०८३.३३ रूपये वर्ग करण्याबाबतच्या योग्य त्या सुचना वादी बॅकेने महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटीव्ह बॅक लिमिटेड मुंबई, यांना फॅक्सने पाठविल्या. त्याप्रमाणे वादी यांच्या खात्यातून वर नमूद रक्कम प्रतिवादी क्र. १ कंपनीच्या बॅक खात्यात जमा करण्यात आली होती.

५. दि. २१.३.२००१ रोजी प्रतिवादी क्र १ तर्फे प्रतिवादी क्र. २ यांनी वादी बॅकेस पत्र पाठवून असे कळविले की, Contract Note क्र. ६५४१, दि. १५.३.२००१ प्रमाणे प्रतिवादी क्र. १ कंपनीने २५ करोड रूपये किमतीच्या, १०.४७ टक्के GOI-2015 या प्रतिभूती वादी बॅकेतर्फे विकत घेतल्या आहेत व रिझर्व्ह बॅकेकडून मुळ प्रतिभूती मिळताच त्या प्रतिभूती वादी बॅकेकडे पाठविण्यात येतील. परंतु सदरील मुळ प्रतिभूती प्रतिवादी कंपनीने वादीस केव्हाही पाठविल्या नाहीत किंवा सदर प्रतिभूतीवरील व्याजसुध्दा वादी बॅकेला दिले नाही. दि. २.७.२००१ रोजी वादी बॅकेने प्रतिवादी क्र. १ कंपनीकडे प्रतिभूतींमधील गुंतवणूकीवर व्याजाची मागणी केली होती. तारीख २९.३.२००१ च्या धनादेशाने रक्कम रूपये ४,१७,९८६.११, तारीख ४.९.२००१ च्या धनादेशाने रक्कम रूपये १,२८,१२,५००/- व रूपये २,००,०००/- असे एकूण १,३४,३०,४८६.११ रूपये प्रतिवादी क्र. १ कंपनीने वादी बॅकेस दिलेले आहेत. सदरील रक्कम ही गुंतविलेल्या रकमेचे व्याज म्हणून वादींनी जमा करून घेतली.

६. सदरील व्याजाची दिलेली रक्कम ही कमी असल्यामुळे तसेच सदरचें व्याज उशिरा जमा केल्यामुळे वादीच्या झालेल्या नुकसानीसाठी २,००,०००/-रूपयाची मागणी वादीं बॅकेने प्रतिवादी क्र. १ कंपनीकडे तारीख १७.९.२००१ रोजी फॅक्स पाठवून केली. त्याचप्रमाणे वारंवार मुळ प्रतिभूतीची मागणी प्रतिवादी कंपनीकडे करण्यात आली. परंतु प्रतिवादींनी सदर प्रतिभूती वादी बॅकेकडे पाठविल्या नाहीत. म्हणून तारीख ४.१.२००२ रोजी फॅक्स पाठवून तसेच तारीख १५.३.२००२ व १९.४.२००२ रोजी पत्र पाठवून, वादी बॅकेने गूंतवलेली

रक्कम रूपये २५ करोड परत करावेत व तारीख १.१२.२००१ रोजी पर्यंत सदर रकमेवर येणारे व्याज दयावे, अशा मागण्या वादी बॅकेने प्रतिवादी क्र. १ कंपनीकडे केल्या होत्या.

७. वरीलप्रमाणे वादी बॅकेने तगादा लावल्यावर शेवटी प्रतिवादी क्र. १ कंपनीने २६,७५,१५,२७०/-रूपयांचा एक व रक्कम रूपये १,२८,१२,५००/-चा एक असे तारीख २०.४.२००२ चे एकूण दोन धनादेश वादी यांना पाठविले. सदरचे धनादेश तारीख २३.४.२००२ रोजी वटण्यासाठी जमा केले असता ते प्रतिवादीच्या खात्यात पुरेशी रक्कम नाही असा शेरा मारून परत आले. त्यानंतर चौकशीअंती असे लक्षात आले की, प्रतिवादी क्र. १ कंपनीने वादी बॅकेकडून प्रतिभूतीमध्ये गुंतविण्यासाठी घेतलेल्या पैशातून कोणत्याही सरकारी प्रतिभूती विकत घेतल्या नाहीत व वादी बॅकेची फसवणूक केली आहे. सबब तारीख २६.४.२००२ रोजी वादी बॅकेने वर्धा पोलीस स्टेशनला, प्रतिवादी क्र. १ कंपनी व तिचे संचालक यांचेविरूध्द तक्रार दाखल केली. त्यावरून वर्धा पोलीसांनी अपराध क्र. ११०/२००२ चा गुन्हा दाखल केला. त्याचप्रमाणे धनादेश न वटल्याबद्दल वादी बॅकेने प्रतिवादींविरूध्द फौजदारी तक्रार क्र. ३३८४/०२ दाखल केली आहे.

८. अपराध क्र. ११०/२००२ च्या तपासामध्ये तपासी अधिकारी यांना असे दिसून आले की, प्रतिवादी क्र. १ कंपनीने वादीकडून घेतलेली रक्कम रूपये २५ करोड वेगवेगळया बॅक खात्यामध्ये फिरवून नंतर त्यात स्वत:चे १५ करोड रूपये घालून ती रक्कम नागपूर डी.सी.सी. बॅकेला दिली आहे. सबब तपासी अंमलदारांनी सदर रकमपैकी २५ कोटी रूपये तपासादरम्यान जप्त केले आहेत. तपासी अधिका-यांनी फौजदारी न्यायालयात तपासाचा अंतिम अहवाल दाखल केला असून त्यास फौजदारी खटला क्र. ५७३/२००२ असा क्रमांक देण्यात आला आहे व तपासादरम्यान जप्त केलेली रक्कम सदर फौजदारी न्यायालयात जमा केलेली आहे.

९. वादी यांचे पुढे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. १ कंपनीने वादीकडून घेतलेल्या पैशातून वादी बॅकेसाठी प्रतिभूती विकत घेतल्या नाहीत.

त्यामुळे वादी बॅकेला सदरील रकमेवर १८ टक्के दराने व्याज मिळण्याचा अधिकार आहे: तारीख १६.३.२००१ ते २६.८.२००२ पर्यंतचे म्हणजे वादी बॅकेने प्रतिवादी क्र. १ कंपनीस ज्या दिवशी प्रतिभूती खरेदीसाठी पैसे वर्ग केले तिथपासून ते दावा दाखल तारखेपर्यंतचे व्याज ६,५६,२५,०००/-रूपये होते. पैकी प्रतिवादी क्र. १ कंपनीने वादीस वेळोवेळी दिलेले १,३४,३०,४८६.११ इतकी व्याजाची रक्कम वजा करता येणारी ५,२१,९४,५१३.८९ अधिक प्रतिभूती खरेदीसाठी दिलेली रक्कम रूपये २५,००,००,०००/-अशी ३०,२१,९४,५१३.८९ रूपये व त्यावर १८ टक्के दराने होणारे पुढील व्याज मिळावे यासाठी वादी यांनी प्रस्तूत दावा दाखल केला आहे.

१०. प्रतिवादी क्र. १ ते ५, ७ ते ९ व १० यांच्याविरूध्द दावा एकतर्फा चालला आहे.

११. प्रतिवादी क्र. ६ यांनी नि. ३० ला , प्रतिवादी क्र. ११ व १२ यांनी नि. क्र. ४१ ला आपआपल्या कैफीयती दाखल करून वादीच्या मागणीस विरोध केला आहे. सदर प्रतिवादीचे थोडक्यात असे कथन आहे की, वादी व प्रतिवादी क्र. १ यांच्यात झालेल्या कोणत्याही व्यवहाराची सदर प्रतिवादींना व्यक्तीशः माहीती नाही , त्यामुळे त्यांनी वादींची सर्व कथने नाकारली आहेत. सदर प्रतिवादींच्या मते संबंधीत वेळी ते प्रतिवादी क्र. १ कंपनीचे संचालक नव्हते किंवा त्यांनी व्यक्तीशः प्रतिवादी क्र. १ कंपनीचे संचालक म्हणून वादी बॅकेसोबत कोणताही व्यवहार केलेला नाही. त्यामुळे वादी बॅकेचे देणे देण्यास सदरी प्रतिवादी व्यकतीशः किंवा संयुक्तपणे जबाबदार नाहीत.

१२. माझे पुर्वाधिकारी यांनी नि.क्र. ४२ ला मुद्दे काढले होते. त्यानंतर वादी यांनी तपासलेला साक्षीदार क्र. १ चा उलट तपास प्रतिवादी क्र. ६ व ११ ते १२ यांचे वतीने ॲडव्होकेट श्री ध्रुव यांनी घेतला आहे. वादीचे साक्षीदार क्र. २ यांचा उलट तपास प्रलंबित असतांना वादींनी प्रतिवादी क्र. ६, ८, ९, ११ व १२ यांचेविरूध्दचा दावा मागे घेण्याबाबत नि.क्र. ११६ ला पुरशीस दाखल केली. त्या अनुषंगाने तारीख ९.४.२०१२ रोजी नि. क्र. १ वर आदेश पारित करून

प्रतिवादी क्र. ६, ८, ९, ११ व १२ यांचेविरूध्दचा दावा खर्चासह रद्द केला आहे. त्यामुळे प्रतिवादी यांनी नि.३० व ४१ ला दाखल केलेल्या कैफीयतीमधील कथने विचारात घेण्याची आवश्यकता राहीलेली नाही व त्यामुळे नि. ४२ ला काढण्यात आलेले मुद्दे अनावश्यक झाले आहेत.

१३. असे असले तरी प्रस्तूतचा दावा हा मोठ्या रकमेचा व गुंतागुंतीचा आहे. त्याचप्रमाणे वादी यांनी तोंडी व कागदोपत्री पुरावा दाखल केला आहे. तसेच वादींच्या काही साक्षीदारांचा उलट तपास सुध्दा प्रतिवादी क्र. ६ व ११ ते १२ यांच्यातर्फे घेण्यात आलेला आहे. त्यामुळे केवळ वादी बॅकेची कथने विचारात घेवून निर्णय करण्यापेक्षा उपलब्ध असलेला सर्व पुरावा विचारात घेवून दाव्याचा निर्णय गुणांनुगुणांवर करणे योग्य होईल असे माझे मत्त झाल्यामुळे मी खालील मुद्दे विचारार्थ घेतले व त्यांची कारणांसह उत्तरे मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

मुद्दे		उत्तर
१.	वादी बॅकेला रक्कम रूपये ३०,२१,९४,५१३.८९ वसूल करून मिळण्याचा अधिकार आहे काय ? ...	होय
२.	वादी बॅकेला दावा दाखल झाल्यानंतरच्या कालावधीचे व्याज मागण्याचा अधिकार आहे काय ? ...	होय
	असल्यास, किती दराने ?	अंतिम निर्णयाप्रमाणे
३.	सर्व प्रतिवादी वैयक्तीक व संयुक्तरित्या रक्कम देण्यास जबाबदार आहेत काय ?...	होय, फक्त प्रतिवादी क्र. १ ते ४.
४.	अंतिम आदेश व हुकूमनामा काय आहे ?	दावा मंजूर

कारणमिमासा

मुद्दा क्र. १ :-

१४. वादी बॅकेने त्यांचे सध्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी अरूण गंगाधर

मुद्देश्वर यांची साक्ष नि. [illegible] नोंदविली आहे तर वादी बॅकेचे तत्कालीन सरव्यवस्थापक राजन सालपेकर यांची साक्ष नि. ८२ वर नोंदविली आहे. वादी बॅकेने दाखल केलेल्या फौजदारी गुन्हा क्र. ११०/२००२ व १२४/२००२ मधील तपासी अंमलदार पोलीस निरीक्षक श्री संजय देशपांडे यांचे साक्ष नि.क्र १२० तर संबंधीत तपासकामी वादी बॅकेचे पैसे प्रतिवादी कंपनीने कशा प्रकारे व कोणकोणत्या खात्यातून फिरविले याबाबत सनदी लेखापाल यज्ञेश दलाल यांची साक्ष नि. १२३ ला नोंदविण्यात आली आहे. सदर तोंडी पुराव्या व्यतिरिक्त कागदोपत्री पुरावा अभिलेखात दाखल आहे पैकी आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्याचा उल्लेख न्यायनिर्णयाच्या योग्य टप्प्यावर करण्यात आला आहे.

१५. वादीतर्फे साक्षीदार क्र. १ अरूण मुद्देश्वर हे वादी बॅकेत सन २०११ पासून काम करत आहेत. उलट तपासात त्यांनी असे सांगितले आहे की, ते वादी बॅकेत हजर झाले त्यापूर्वी प्रस्तूत दाव्याबाबत घडलेल्या घटनांची त्यांना व्यक्तीश: माहीती नाही. सबब सदर साक्षीदार यांनी दिलेली साक्ष ही ऐकीव स्वरूपाची व कागदपत्रांवर आधारीत असल्यामुळे संबंधीत कागदपत्रे ही प्रस्तूत साक्षीदाराच्या तोंडी पुराव्यापेक्षा महत्वाची आहेत. त्यामुळे सदर साक्षीदाराची साक्ष ही औपचारीक स्वरूपाची असल्यामुळे ती वादी बॅकेला दावा शाबीत करण्यासाठी उपयोगाची नाही.

१६. वादीतर्फे साक्षीदार क्र. २ राजन सालपेकर हे प्रतिवादी क्र. १ कंपनीशी सरकारी प्रतिभूती खरेदी करण्याबाबत जो व्यवहार झाला त्यावेळी वादी बॅकेचे सरव्यवस्थापक होते. प्रतिवादी क्र. १ कंपनीशी झालेल्या व्यवहाराची व कागदपत्रांची व्यक्तीश: माहीती सदर साक्षीदारांना असल्याचे त्यांच्या पुराव्यावरून दिसून येते. या दाव्यासाठी आवश्यक असणारी सर्व मुळ कागदपत्रे ही वादी बॅंकेने दाखल केलेल्या फौजदारी खटल्यामध्ये तपासी अंमलदार यांनी जप्त केलेली होती. सदर दाव्याच्या चौकशीकामी सदरील मुळ कागदपत्रे ही फौजदारी न्यायालयातून मागविण्यात आली होती. त्याचप्रमाणे वादी यांनी सदरील मुळ कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती या दाव्यात दाखल केलेल्या होत्या. मुळ कागदपत्रांची पडताळणी

करून ती फौजदारी खटल्याच्या कामी फौजदारी न्यायालयात परत पाठविण्यात आली आहेत. साक्षीदार क्र. २ राजन सालपेकर यांनी मुळ कागदपत्रे पाहून ती शाबीत केली आहेत. त्यामुळे मुळ कागदपत्रांच्या प्रमाणित प्रतींना नि.क्र.८३ ते ९२ व नि ९९ ते ११३ देण्यात आलेले आहेत.

१७. साक्षीदार क्र. २ राजन सालपेकर यांच्या साक्षीचा विचार करता असे दिसून येते की, वादी बॅंकेला प्रतिवादी क्र. १ कंपनीने नि. ९९ चा फॅक्स ता.८.३.२००१ रोजी पाठवून प्रतिवादी क्र. १ कंपनीचा महाराष्ट्र राज्य सहकारी बॅंकेतील खाते क्र. १७०३१ असा असल्याचे कळविले होते. तारीख १६.३.२००१ रोजी वादी बॅंकेने त्यांचे खाते असलेल्या बॅंकेस म्हणजे महाराष्ट्र राज्य सहकारी बॅंकेस प्रतिवादी क्र. १ कंपनीच्या वर नमूद बॅंक खात्यात २५,२४,७२,०८३.३३ इतकी रक्कम वर्ग करण्याची सुचना नि.१०५ च्या पत्राने पाठविली होती. नि. १०८ च्या पत्राने सदर रकमेची पावती व कराराची टिपणी पाठविण्याची विनंती वादींनी प्रतिवादी क्र. १ कंपनीकडे केली होती. प्रतिवादी क्र. १ कंपनीने वादी बॅंकेस नि. १०३ चे पत्र पाठवून वादीच्या वतीने प्रतिभूती घेतल्याचे वादीस कळविले होते. तारीख ३०.३.२००१ रोजी वादी बॅंकेने प्रतिवादी क्र. १ कंपनीचे संचालक प्रतिवादी क्र.४ केतन सेठ यांना पत्र पाठवून प्रतिभूती अद्यापही मिळाल्या नाहीत, त्या पाठविण्याची विनंती केली होती.

१८. सदर साक्षीदार यांच्या पुराव्यावरून पुढे असे दिसून येते की, प्रतिवादी क्र. १ कंपनीने वादी बॅंकेस रक्कम रूपये १,२८,१२,५००/-चा नि. ८४ चा एक व रक्कम रूपये २६,७५,१५,२७०/-चा नि.८५ चा एक असे तारीख २०.४.२००२ रोजीचे एकूण दोन धनादेश पाठविले होते. सदरचे दोन्हीही धनादेश न वटता परत आल्याचे नि. ८६ व नि. ८८ च्या बॅंकेच्या मेमोवरून दिसून येते.

१९. वरील पुराव्यावरून असे दिसून येते की, वादी यांनी दाखल केलेल्या तोंडी पुराव्याच्या समर्थनार्थ योग्य तो कागदोपत्री पुरावा सुध्दा उपलब्ध करण्यात आला आहे. सदरील सर्व पुरावा हा आव्हान विरहीत राहीलेला आहे. त्याचप्रमाणे सदरचा पुरावा नाकारावा यासाठी कोणतेही संयुक्तीक कारण मला दिसून येत

नाही. त्याचप्रमाणे धनादेशाबाबत असलेले गृहीतक विचारात घेता धनादेशामध्ये नमूद असणारी रक्कम ही धनकोस देणे होती असाच निष्कर्ष काढावा लागेल. या सर्व बाबींचा विचार करता वादी बॅकेने प्रतिवादी क्र. १ कंपनीस २५,२४,७२,०८३.३३ इतकी रक्कम प्रतिभूती खरेदी करण्यासाठी दिली होती हे शाबीत होते.

२०. साक्षीदार क्र. ४ यांची साक्ष व नि. १२१ सोबत सदर साक्षीदार यांनी दिलेला रूट मॅप विचारात घेता असे दिसून येते की, दि.१६ मार्च २००१ रोजी वादी बॅकेने प्रतिवादी क्र. १ कंपनीस धनादेशाने दिलेली रक्कम प्रतिवादी क्र. १ यांच्या महाराष्ट्र राज्य सहकारी बॅकेतील खाते क्र. १७०३१ मध्ये जमा झाली होती. तारीख १९ मार्च २००१ रोजी प्रतिवादी क्र. १ कंपनीने वादी यांची सदरील रक्कम जनता सहकारी बॅकेतील प्रतिवादी क्र. १ च्या दुस-या खात्यात म्हणजे खाते क्र. २३६४ मध्ये जमा केली होती. त्याच दिवशी खाते क्र. २३६४ मधून दहा कोटी रूपये प्रतिवादी क्र. १ कंपनीने जनता सहकारी बॅकेमधील हुगली ट्रेडींग ॲन्ड इन्व्हेस्टमेंटच्या खाते क्र.२४६८ मध्ये तर राहीलेली पंधरा कोटी रूपये पोतदार ट्रेडींग कंपनीच्या जनता सहकारी बॅकेतील खाते क्र. २४६५ मध्ये जमा केली. त्याच दिवशी म्हणजे तारीख १९ मार्च २००१ रोजी हुगली ट्रेडींग ॲन्ड इन्व्हेस्टमेंटच्या खातेक्रमांक २४६८ मधून दहा कोटी रूपये मनीराम कन्सल्टंड ॲन्ड इन्व्हेस्टमेंट च्या खाते क्र.२५६६ मध्ये धनादेशाने जमा करण्यात आली व पुन्हा त्याच दिवशी सदरील दहा कोटी रूपये मनीराम कन्सल्टंड ॲन्ड इन्व्हेस्टमेंटच्या खात्यातून डलहौसी सेक्यूरीटीज प्रायव्हेट लिमिटेड च्या खाते क्र. २५१५ मध्ये धनादेशाने जमा करण्यात आली. सदरचे दहा कोटी रूपये त्याच दिवशी पुन्हा इ.डी.टी. व्ही. इंडीयाचे खाते क्र. २५९९ मध्ये धनादेशाने जमा करण्यात आली होती.

२१. राहीलेली पंधरा कोटी रूपये जी पोतदार ट्रेडींग कंपनीच्या जनता सहकारी बॅकेतील खाते क्र. २४६५ मध्ये जमा केली होती त्यापैकी तेरा कोटी एकोणपन्नास लाख रूपये तारीख १९.३.२००१ रोजीच मनीराम कन्सल्टंट

प्रायव्हेट लि. चे खातेक्रमांक २५६६ मध्ये धनादेशाने जमा करण्यात आली. ती रक्कम पूढे डलहौसी सेक्यूरीटीज प्रायव्हेट लि. च्या खाते क्र.२५१५ या खात्यात त्याच दिवशी धनादेशाने जमा करण्यात आली.

२२. पोतदार ट्रेडींग कपंनीच्या खातेक्रमांक २४६५ मध्ये राहीलेली एक कोटी एक्कावन लाख रूपये रक्कम त्याच दिवशी म्हणजे दि. १९.३.२००१ रोजी डलहौसी सेक्यूरीटीज प्रायव्हेट लि. च्या खातेक्रमांक २५१५ मध्ये धनादेशाने जमा करण्यात आले. अशा रितीने डलहौसी सेक्यूरीटीज प्रायव्हेट लि.च्या खातेक्रमांक २५१५ मध्ये दि. १९.३.२००१ रोजी एकूण पंचवीस कोटी रूपये जमा करण्यात आले व ते त्याच दिवशी इ.डी.टी.व्ही. इंडीया लि. च्या खातेक्रमांक २५९९ मध्ये धनादेशाने जमा करण्यात आले होते. सदरची पंचबीस कोटी रूपये अधिक पंधरा कोटी रूपये असे एकूण चाळीस कोटी रूपये त्याच दिवशी म्हणजे १९.३.२००१ रोजी धनादेशाने नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेत जमा करण्यात आले होते.

२३. वरील पुराव्यावरून, वादी यांनी दिलेली रक्कम प्रतिवादी क्र. १ कंपनीने प्रत्यक्षात प्रतिभूती खरेदीसाठी न वापरता ती अन्य वेगवेगळया खात्यामध्ये कशाप्रकारे फिरवत नेली हे स्पष्ट होते. सदरच्या रकमेतून प्रतिवादींनी प्रत्यक्षात प्रतिभूती खरेदी केल्या असे दाखविणारा पुरावा उपलब्ध नाही. सदरचा निष्कर्ष काढण्यास दुसरे असे कारण आहे की, प्रतिवादी क्र. १ कंपनीने नि.८४ व ८५ चे दोन धनादेश वादी यांच्या नांवे पाठविले होते. प्रत्यक्षात जर प्रतिवादींनी सबंधीत प्रतिभूती खरेदी केल्या असत्या तर सदरचे धनादेश वादी बॅकेस पाठविण्याची प्रतिवादी क्र. १ कंपनीस कोणतेही कारण नव्हते. सबब वादी बॅकेने २५,२४,७२,०८३.३३ इतकी रक्कम प्रतिवादी १ कंपनीस दिली होती परंतु प्रतिवादी क्र. १ कंपनीने सदरची रक्कम प्रतिभूती खरेदी करण्यासाठी वापरली नाही असे शाबीत होते.

२४. वादी यांनी प्रत्यक्षात २५,२४,७२,०८३.३३ इतकी रक्कम प्रतिवादी क्र. १ कंपनीस दिली होती. वादी यांच्याच कथनाप्रमाणे २५ कोटी रूपयांच्या

(7)

प्रतिभूती खरेदी करावयाच्या होत्या. असे असतांना २४,७२,०८३.३३ ही जास्तीची रक्कम प्रतिवादी क्र. १ कंपनीस कशासाठी देण्यात आली याचा खुलासा वादी यांच्या कथनावरून किंवा पुराव्यावरून होत नाही. वादी यांच्या वकीलांनी सदरची रक्कम ही प्रतिभूती खरेदीसाठी दयावयाचे कमिशन होते असा युक्तीवाद केला आहे. प्रत्यक्षात प्रतिभूती खरेदी करण्याचा व्यवहार झाला नसल्याने कमिशन देण्याचा प्रश्न आता निर्माण होत नाही. असे असतांना वादी यांनी फक्त २५ कोटी रूपये व त्यावरील दावा दाखल तारखेपर्यंतचे व्याज ५,२१,९४,५१३.८९ रूपये अशा एकूण ३०,२१,९४,५१३.८९ इतक्या रकमेचा हुकूमनामा मागितला आहे. सदर रकमेतून २४,७२,०८३.३३ ही रक्कम का वगळण्यात आली आहे याबाबत कोणतेही स्पष्टीकरण वादी बॅकेकडून करण्यात आलेले नाही. या सर्व बाबींचा विचार करता वादी यांनी २५ कोटी रूपये वसूलीची केलेली मागणी मान्य करण्यास कोणतीच अडचण दिसून येत नाही.

२५. वादी यांनी तारीख १६.३.२००१ ते दावा दाखल तारखेपर्यंत म्हणजे दि. २६.८.२००२ पर्यंत १८ टक्के दराने ६,५६,२५,०००/-इतकी व्याजाची आकारणी केलेली आहे व त्यातून प्रतिवादी क्र. १ कंपनीने दिलेली १,३४,३०,४८९.११ ही रक्कम वजा करता ५,२१,९४,५१३.८९ इतक्या रकमेची मागणी केली आहे. परंतु वादी यांनी प्रतिभूतीमध्ये रक्कम गुंतवली असती तर किती टक्क्याने फायदा मिळाला असता याबाबत कोणताही पुरावा दाखल केलेला नाही किंवा १८ टक्के दराने केलेली मागणी कोणत्या आधारावर केली आहे याबाबतही खुलासा केलेला नाही. सन २००२ साली रिझर्व्ह बॅकेचा रेपो दर तसेच प्रचलित रेपो दर याचा विचार करता वादी बॅकेने सदरची रक्कम भारतीय रिझर्व्ह बॅकेत गुंतविली असती तरीही १८ टक्के दराने परतावा मिळाला नसता. असे असले तरी वादी बॅकेने प्रतिवादी क्र. १ कंपनीस दिलेली रक्कम ही सर्वसामान्य जनता तसेच वेगवेगळया सहकारी संस्था यांनी वादी बॅकेत ठेवलेल्या ठेवीतून जमा झालेल्या रकमेतून दिली गेली आहे. त्याचप्रमाणे सर्वसामान्य कर्जदार यांना सहकारी संस्थेकडून दिले जाणारे कर्ज हे साधारणत: १५ ते १८ टक्के च्या दरम्यान असते.

त्यापेक्षा कमी दराने व्याजाची आकारणी केल्यास जी व्यक्ती रितसर कर्ज घेते त्यांना जास्त व्याजदर व जे फसवणूक करून रक्कम वापरतात त्यांना कमी व्याज दर असा चुकीचा संदेश जनतेमध्ये जाईल. वादी यांचेकडून घेतलेली रक्कम प्रतिवादी क्र. १ कंपनीने प्रतिभूती खरेदी करण्यासाठी न वापरता ती अन्यत्र वळविली आहे व त्यामुळे वादी बॅकेची फसवणूक झाली आहे. वादी हे जरी सदरील रकमेस व्याजाची रक्कम म्हणत असतील तरी सदरील रक्कम प्रत्यक्षातील नुकसान भरपाईची रक्कम आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादी क्र. १ कंपनीकडून १८ टक्के दराने व्याजाची केलेली मागणी ही समर्थनीय ठरवावी लागेल. सबब प्रतिवादी क्र. १ यांना रक्कम दिल्या तारखेपासून ते दावा दाखल करेपर्यंत म्हणजे तारीख १६.३.२००१ ते २६.८.२००२ या कालावधीतील नुकसानीची रक्कम म्हणून १८ टक्के दराने आकारणी करून येणारी रक्कम रूपये ५,२१,९४,५१३.८९ चा हुकूमनामासुध्दा वादींना देणे न्यायाचे होणार आहे. या बाबींचा विचार करता २५,००,००,०००/-रूपये अधिक ५,२१,९४,५१३.८९रूपये असे एकूण ३०,२१,९४,५१३.८९ रूपयांच्या हुकूमनाम्याची वादींची मागणी शाबीत झाली आहे असा निष्कर्ष मी नोंदविला आहे.

मुद्दा क्र. २ :-

२६. वादी यांनी दावा दाखल तारेखनंतरच्या कालावधीसाठी सुध्दा १८ टक्के दराने व्याजाची मागणी केलेली आहे. यापुर्वीच्या परिच्छेदात विवेचन केल्याप्रमाणे वादी यांना दावा दाखल तारखेपूर्वी १८ टक्के दराने व्याज म्हणजेच नुकसान भरपाई मिळण्याचा अधिकार आहे हे मी स्पष्ट केलेले आहे. असे असले तरी दावा दाखल तारखेनंतरचे व्याज हे दिवाणी प्रक्रिया संहितेच्या कलम ३४ मधील तरतुदीप्रमाणे ठरविणे आवश्यक आहे. सदर तरतूदीप्रमाणे वादी प्रतिवादी यांच्यातील व्यवहार हा व्यावसायिक स्वरूपाचा असेल तर वादी प्रतिवादी यांच्यातील कराराप्रमाणे किंवा राष्ट्रीयकृत बॅक ज्या दराने कर्ज देते त्या दरापर्यंत व्याजाचा दर न्यायालयाला ठरविता येईल. परंतु प्रस्तूत प्रकरणी तपासी अंमलदार यांनी वादी बॅकेची प्रतिवादी क्र. १ कंपनीने घेतलेली रक्कम रूपये २५

कोटी फौजदारी खटला क्र. ५७३ / २००१ मध्ये वरील मिळकती जप्त करून ती सध्या मुदती ठेवीच्या स्वरूपात ठेवलेली आहे. अशा परिस्थितीत सध्या वादी यांची रक्कम प्रतिवादी यांच्या कब्ज्यात नाही तर ती मुदत ठेवीच्या स्वरूपात फौजदारी न्यायालयाच्या ताब्यात आहे. सबब सदर मुदत ठेवीवर मिळणा-या व्याजाच्या दरापेक्षा कमी किंवा जास्त दर ठरविणे न्यायाचे होणार नाही. सदर मुदत ठेवीवर किती टक्के दराने व्याज मिळत आहे याबाबत पुरावा या न्यायालयात उपलब्ध करण्यात आलेला नाही. या बाबींचा विचार करता फौजदारी न्यायालयाने मुदत ठेवीच्या रूपात ठेवलेल्या रकमेवर ज्या दराने व्याज मिळत आहे त्याच दराने पुढील व्याज वादीला देणे न्यायोचित होणार आहे. त्याप्रमाणे प्रस्तूत मुद्दयावर माझा निष्कर्ष मी नोंदवित आहे.

मुद्दा क्र. ३ :-

२७. वादी यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. २ ते १२ हे प्रतिवादी क्र. १ या कंपनीचे संचालक आहेत त्यामुळे प्रतिवादी क्र. १ कंपनी बरोबरच प्रतिवादी क्र. २ ते १२ हे सुध्दा व्यक्तीश: व संयुक्तीकरित्या वादी यांची रक्कम देण्यास जबाबदार आहेत. दावा चालू असतांना वादी यांनी प्रतिवादी क्र.६, ८, ९, ११ व १२ यांचेविरूध्दचा दावा मागे घेतला आहे. सबब सदर प्रतिवादींच्या जबाबदारीचा प्रश्न प्रस्तूत दाव्यात निर्माण होत नाही.

२८. सबब फक्त उर्वरित प्रतिवादी यांच्या बाबतीत अभिलेखावरील पुराव्याचे अवलोकन करणे गरजेचे आहे. वादी यांच्या वतीने तपासलेल्या साक्षीदारांपैकी साक्षीदार क्र. २ राजन साल्पेकर हेच एकमेव असे साक्षीदार आहे की ज्यांना प्रतिवादी क्र. १ कंपनीसोबत वादी बॅंकेचा झालेला व्यवहार व्यक्तीश: माहीतीचा आहे. सदर साक्षीदार राजन साल्पेकर यांनी त्यांच्या सरतपासात परिच्छेद ४ मध्ये असे नमूद केले आहे की, प्रतिवादी क्र. २ ते ४ यांनी असे भासविले की, प्रतिवादी क्र. २ ते १२ हे प्रतिवादी क्र. १ कंपनीचे संचालक आहेत. यावरून हे स्पष्ट होते की, सदरील साक्षीदार यांना स्वत:ला सुध्दा प्रतिवादी क्र. २ ते १२ हे प्रतिवादी क्र. १ कंपनीचे संचालक आहे याची खात्री नाही.

त्यांचप्रमाणे प्रतिवादी क्र. १ या कंपनीचे नेमके संचालक कोण आहेत याविषयी कंपनी निबंधकांकडून योग्य ती कागदपत्रे वादी बॅंकेस सहज उपलब्ध होवू शकली असती. परंतु असा कोणताही थेट कागदोपत्री पुरावा वादींनी हजर केलेला नाही ज्यावरून प्रतिवादी क्र. २ ते १२ हे प्रतिवादी क्र. १ कंपनीचे संचालक आहेत असे म्हणता येईल.

२९. प्रतिवादी क्र. २ बाबत साक्षीदार राजन साल्पेकर यांनी असे कथन केले आहे की, तारीख २०.४.२००२ चे नि.८४ व नि. ८५ च्या धनादेशावर असणा-या सहया या प्रतिवादी क्र. २ संजय अग्रवाल यांच्या आहेत. नि. ८४ व ८५ चे अवलोकन करता संबंधीत धनादेशावर केलेली सही ही Authorised signatory/Director या नात्याने केलेली आहे. त्याचप्रमाणे तारीख १९.४.२००२ च्या पत्रावर असणारी सही ही प्रतिवादी क्र. २ संजय अग्रवाल यांची आहे. सदरचे पत्र नि. १०४ ला आहे. सदर नि. १०४ म्हणजे प्रतिवादी क्र. १ कंपनीचे संचालक म्हणून वादी बॅंकेस पाठविलेले पत्र आहे. त्याचप्रमाणे साक्षीदार साल्पेकर यांनी त्यांच्या साक्षीत असे कथन केले आहे की, वादी बॅंकेशी प्रतिवादी क्र. १ कंपनीने केलेल्या व्यवहाराबाबत प्रतिवादी क्र. २ ते ४ यांच्याशी संपर्क साधण्यात येत होता. वरील पुराव्याचे अवलोकन करता असे दिसून येते की, जरी प्रतिवादी क्र. १ कंपनीचे संचालक कोण होते याचा थेट पुरावा उपलब्ध नसला तरी प्रतिवादी क्र. २ हे प्रतिवादी क्र. १ कंपनीचे संचालक म्हणून काम पाहत होते व प्रतिवादी क्र. २ ते ४ हे प्रतिवादी क्र. १ कंपनीचे प्रतिनिधी म्हणून वादी बॅंकेशी व्यवहार करत होते.

३०. प्रतिवादी क्र. १ कंपनी ही लिमिटेड कंपनी आहे. अशा कंपनीचे देणे देण्याची अमर्याद जबाबदारी संचालकांवर असते असे दाखविणारी कोणतीही कायदेशीर तरतूद माझया निदर्शनास आणण्यात आली नाही. याउलट कंपनी कायदयाप्रमाणे "लिमिटेड" हा संबंधीत कंपनीच्या नावानंतर येणारा शब्द असे स्पष्ट सूचित करतो की, संबंधीत कंपनीच्या सभासदांची जबाबदारी ही मर्यादीत आहे. या बाबींचा विचार करता केवळ एखादी व्यक्ती एखादया कंपनीची संचालक

आहे म्हणून सदरची व्यक्ती ही कंपनीने देणे असलेल्या रकमेस वैयक्तीकपणे जबाबदार धरता येणार नाही.

३१. असे जरी असले तरी कंपनी ही नैसर्गिक व्यक्ती नाही तर नैसर्गिक व्यक्तींद्वारे चालविली जाणारी संस्था आहे. सदर संस्थेच्या नावाने नैसर्गिक व्यक्तीने जर काही बेकायदेशीर कृत्य करून कंपनीची जबाबदारी वाढविली असेल तर अशी जबाबदारी फक्त कंपनीवर टाकणे कायदयास धरून होणार नाही. किंबहूना, संचालकांनी केलेल्या बेकायदेशीर व्यवहारांना कंपनी जबाबदार राहणार नाही. अन्यथा असे संचालक बेकायदेशीर व्यवहार करून स्वत:चा व्यक्तीगत फायदा करून घेतील व त्याची परतफेड कंपनीला म्हणजे पर्यायाने कंपनीच्या सभासदांना करावी लागेल. प्रस्तूत प्रकरणी वादी यांनी दिलेली रक्कम प्रतिवादी क्र. १ कंपनीच्या बॅक खात्यात जमा झाली आहे. त्यामुळे सदरची रक्कम ही थेटपणे प्रतिवादी क्र. १ कंपनीस दिली गेली आहे. या बाबींचा विचार करता प्रतिवादी क्र. १ कंपनी ही वादीचे देणे देण्यास थेटपणे जबाबदार आहे. त्याचप्रमाणे प्रतिवादी क्र. २ ते ४ यांनी बेकायदेशीरपणे कृत्य करून वादी बॅकेची रक्कम ही अन्यत्र वळविली आहे. सदरची प्रतिवादी क्र. २ ते ४ यांची व्यक्तीगत कृती पाहता प्रतिवादी क्र. १ कंपनी बरोबरच प्रतिवादी क्र. २ ते ४ यांना व्यक्तीश: व सामुहिकपणे वादी बॅकेची रक्कम देण्यास जबाबदार धरणे न्यायाचे होणार आहे. सबब वादी बॅकेस दयावयाची रक्कम प्रतिवादी क्र. १ कंपनी बरोबरच प्रतिवादी क्र. २ ते ४ यांचेकडून वैयक्तीकरित्या किंवा सामुहिकपणे वसूल करण्याचा वादी यांना अधिकार आहे. प्रतिवादी क्र. ५, ७ व १० यांचेविरूध्द कोणताही पुरावा उपलब्ध नसल्याने त्यांचेविरूध्दचा दावा नामंजूर करावा लागेल. त्याप्रमाणे प्रस्तूत मुद्दयावर माझा निष्कर्ष मी नोंदविला आहे.

३२. न्यायनिर्णयाचा शेवट करण्यापूर्वी हे नमूद करणे गरजेचे आहे की, वादी यांनी फौजदारी न्यायालयात जमा असलेली रक्कम ही वादी बॅकेचीच असल्याचा युक्तीवाद केला आहे. पुराव्यावरून असे दिसून येते की, फौजदारी न्यायालयात जमा असलेली रक्कम ही वादी बॅकेचीच आहे असे म्हणून तपासी

अंमलदारांनी ती जप्त केलेली आहे. परंतु वादी यांनी दाव्यात केलेल्या विनंत्या पाहता त्यामध्ये फौजदारी न्यायालयात जमा असलेल्या रकमेबाबत कोणतीही मागणी केलेली नसल्याचे स्पष्ट होते. त्याचप्रमाणे वादी यांनीच असे कथन केले आहे की, फौजदारी न्यायालयात जमा असलेल्या रकमेबाबत नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेने वाद उत्पन्न केला आहे. सदर नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक ही प्रस्तूत दाव्यात पक्षकार नाही. अशा परिस्थितीत फौजदारी न्यायालयात जमा असलेल्या रकमेबाबत या दाव्यात भाष्य करणे गैरलागू होणार आहे.

३३. प्रतिवादी क्र. ५, ७ व १० यांचेविरूध्दचा दावा खारीज होणार आहे, परंतु सदर प्रतिवादी हे या दाव्यात हजर झालेले नाहीत त्यामुळे त्यांचा कोणताही खर्च याकामी झालेला नाही. सबब त्यांच्या खर्चाबाबत आदेश करण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. या सर्व बाबींचा तसेच विचारार्थ घेण्यात आलेल्या मुद्दयांवरील उत्तरे विचारात घेता मी पूढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे :-

आदेश

दावा खालीलप्रमाणे खर्चासह मंजूर करण्यात येत आहे :-

१. प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी वादी बॅंकेस रक्कम रूपये ३०,२१,९४,५१३.८९ (तीस कोटी एकवीस लाख चौ-याण्णव हजार पाचशे तेरा रूपये एकोणव्वद पैसे) दयावे.

२. फौजदारी न्यायालयाने मुदत ठेवीच्या रूपाने ठेवलेल्या जप्त रकमेवर ज्या दराने व्याज मिळत आहे त्या दराने वर कलम १ मध्ये नमूद केलेल्या रकमेवर दावा दाखल तारखेपासून ते रक्कम पूर्ण वसूल होईपर्यंतच्या कालावधीचे व्याज प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी वादी बॅंकेस दयावे.

३. वर कलम १ व २ प्रमाणे वादी बॅंकेस दयावयाची रक्कम देण्याची प्रतिवादी क्र. १ ते ४ यांची जबाबदारी वैयक्तीक व सामुहिक स्वरूपाची राहील.

४. वादी यांचा दाव्याचा खर्च प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी वादी बॅंकेस दयावयाचा आहे.

५. प्रतिवादी क्र. ५, ७ व १० यांचेविरूध्दचा दावा खारीज करण्यात येत आहे. परंतु त्यांच्या खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

येणेप्रमाणे हुकूमनामा तयार करण्यात यावा.

दि. ०५.०५.२०१२
वर्धा

(श्रीकांत य.भोसले)
२रे दिवाणी न्यायाधीश,व.स्तर.वर्धा

Copy of Jment- 18 pages

Copying fee Rs. ₹ 2 = 00
Surcharge Rs.
Comparing fee Rs.
Surcharge Rs.
Paper Cost Rs.
Total Rs. ₹ 2 = 00

Stamped
12/10/12

TRUE COPY

Superintendent
District & Sessions Court,
Wardha
12/10/12

Copyist Stamped
Compared